# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आणि कामगार चळवळ

**प्रा. विनायक पवार**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे गरवारे वाणिज्य महाविद्यालय, पुणे ०४

महाराष्ट्राची शाहिरी परंपरा आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ या दोन्ही परंपरेत अण्णाभाऊ साठे यांचे कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते. कारण औद्येगिकीकरणानंतर मुंबईत गिरण्या मोठ्या प्रमाणात चालू झाल्या. या गिरण्यामध्ये मोठ्या प्रमाणात कामगार भरती झाली. या काळात गिरणी मालकांकडून कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण होऊ लागले होते. त्यामुळेच कामगार हे गिरणीतील शोषक घटक बनला होता. अण्णाभाऊ साठे यावेळी कोहिनूर मिलमध्ये काम करू लागले होते. यावेळी कामगारांना अनेक प्रश्न पडले होते, त्यांच्याकडे कोणतीही दिशा नव्हती. त्यामुळे कामगार कितीही वेळ गिरणीमध्ये काम करत असायचे. कामगारांचे काही बरेवाईट झाले तरी अशावेळी मालक वर्ग काहीही करत नव्हते. त्यांना पेन्शन दिले जात नव्हते. ना कुटुंबियांना मदत किंवा त्याची नुकसान भरपाई दिली जात नव्हती. अशा या सर्व अडचणावर मात करत कामगारांची दिशा ठरवणारी धोरणात्मक रचना आखण्यात आली. त्या धोरणात्मक अटी काही कामगारांना मान्य होत्या तर काही कामगारांना मान्य नव्हती. त्यामुळे गिरणी कामगारामध्ये गट पडत गेले. आणि त्यातूनच एक संघटित अशी कामगार चळवळ उभी राहिली.

अण्णाभाऊ साठे मुंबईमध्ये कामाच्या शोधात गेले होते. गिरणी कामगार म्हणून काम करत असतानांच अण्णाभाऊ कामगार चळवळीकडे आकर्षित झाले. आणि हळूहळू त्या चळवळीचे नेतृत्व करू लागले. त्यांच्या रूपाने कामगार चळवळीला एक नेता आणि शाहीर लाभला. याच काळात त्यांच्यातील शाहीरी खऱ्या अर्थाने बहरली. या चळवळीत जगातील अनेक विषयावर पोवाडे लिहिले त्यामध्ये नानकिन नगरापासून मुंबई तसेच काळ्याबाजारावरही लिहिले आहेत. त्यातूनच चळवळीला दिशा मिळत गेली. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी कामगार लढ्याचे नेतृत्व अण्णाभाऊसाठे करत असायचे. महाराष्ट्रातील मराठी माणसाचे विचार मांडताना अण्णाभाऊ असे म्हणतात कीए

आम्हाला चीड दास्याची।
जुलमी सत्तेची। परचक्राची।
इतिहास साक्ष देतो याला।
करूनी आम्ही जबरदस्त हा।
अन्यायाचा कडेलोट केला।

यावरून अण्णा भाऊंचे महाराष्ट्रावरील मुंबईवरील प्रेम हे सर्वश्रुत होते. या प्रेमापोटी कामगार वर्गाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सहभाग घेतला होता. मुंबई ही महानगरी कामगारांची आहेए गुजराती भाषक भांडवलदारांची नव्हे अशा पद्धतीने संयुक्त महाराष्ट्र लढ्याची व्यूहरचना आखण्यात अण्णाभाऊ सह त्यांच्या सहकार्यांना यश प्राप्त झाले होते. अण्णा भाऊंच्या शाहिरीबद्दल, कामगार लढ्यातील सहभागाबद्दल आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हिरहिरीने सहभागी झाल्याबद्दल शाहीर अमरशेख असे म्हणतात कीए भअण्णा भाऊजवळ अन्यायाची चीड होतीए गुलामगिरीविरुद्ध लढण्याची खुमखुमी होती, दु:खए दैन्यए दारिद्र्य यांचा नाश करू इच्छिणाऱ्या शब्दरूप गोळ्यांचं कोठाराच्या कोठार होतं आणि त्यांच्या मानवतावादाच्या तलवारीला समाजवादाची शास्त्रीय पद्धतीनं चढवलेली धार होती म्हणून त्यांचा पोवाडा जनमाणसात नुसता रवंथ करण्यासाठी जात नसे तर ठिणग्या ठिणग्यांनी रान उठवीतसेए पेटवीतसे!श्श भश्श

डॉ. बाबासाहेब आंबेडककरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचा झेंडा लाल होता. डॉ. बाबासाहेबांनी डाव्या पक्षाना आणि संघटनांना सोबत घेऊन मुंबई प्रांतिक सभेवर शेतकरी कामगारांच्या मागण्यासाठी मोर्चा काढला होता. तसाच धागा धरून अण्णाभाऊनी वास्तववादी दृष्टिकोनातून

बघण्याची शिकवण देणाऱ्या आणि दलित-शोषित, कष्टकरी वर्गाला कामगार चळवळीसोबत एकनिष्ठेने ठेवण्याचा प्रयत्न सतत करत असायचे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेल्या मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याच्या नवनिर्मितीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठेए अमर शेख व शाहीर आणि द. ना.गव्हाणकर या शाहीरांचे मोलाचे योगदान होते.

गिरणी मालक भांडवलदार । तसेच सरकार ।

बेदरकार। कदर मजुरांची मुळी न करता।

पिळून शोषित होते रक्ता । गाजवीत आपुली वरती सत्ता।।

भमुंबईचा गिरणीकामगारश्श या पोवाड्यात अण्णाभाऊनी कामगाराचे दाहक चित्र मांडले आहे. गिरणी मालक हा नेहमी भांडवलदारांची भूमिका बजावत असताना कामगारांची बाजू कोणताही भांडवलदार घेत नसायचा हे जवळपास स्पष्ट झाले होते. याउलट कामगारांचे शोषण करणे हा मुळी त्यांचा धर्म बनला होता. त्यांचा एकच धर्म उरला होता तो म्हणजे कामगाराकडून १४-१४ तास काम करून घेणे. कारण शासनाकडून कामगारांच्या बाजूने कोणताही कायदा बनवण्यात आलेला नसल्यामुळे मुळी न्यायाची बाजूच गळून पडली होती. शिवाय कामगारांना कोणत्याही परिस्थितीत कामावर हजर व्हावे
लागालचे. त्यांना कोणतीही रजा, भत्ता वा बोनस दिले जात नसायचे.

अशा परिस्थितीत मुंबईत कामगारांनी संप सुरू केला होता. त्या संपामध्ये मुंबईतील ८४ गिरणीतील कामगार एकत्र आले होते. आणि ते सर्व कामगार सहा महिने संपावर गेले. तेव्हा गिरणी मालक आणि सरकार या दोघांनाही जाग आली. अशा परिस्थिती गिरणी मालक आणि सरकार यांनी योग्य नियोजन करून प्रश्न सोडवण्याऐवजी वा वेगळा मार्ग काढण्याऐवजी त्यांनी कामगारांचे संप मोडून काढण्याचा सर्वोतोपरी प्रयत्नही केले. पण त्यात सरकार अपयशी झाले. अर्थात दडपशाही, दमदाटी, लाठीमार, धरपकड आणि शेवटी गोळीबार इतक्या शस्त्राचा वापर सरकार करूनही अपयशी झाले होते. अशा परिस्थितीत कामगारांनी आपला संप मागे न घेता एकदिलाने आणि एकजूटीने लढत राहिले. सरकारच्या कोणत्याही आमिषाला बळी पडले नाही. उलट या चळवळीतील परशुराम जाधव या कामगाराने सरकारच्या खोट्या धोरणाला न जुमानता त्याने प्राणांची आहुती दिली. मात्र नरमाईची भूमिका घेतली नाही. येथून पुढे कामगारांची एक युनियन उभी राहिली. या युनियनला कॉम्रेड श्रीपाद अण्णा डांगे, एस. एस. मिरजकर आणि बी. एफ. ब्रॅडले हे तीन नेते कामगार नेते लाभले. कामगार चळवळीवरील ‘ एकजुटीचा नेताश्च या पोवाड्यात अण्णाभाऊ नेतृत्वाबद्दल आपले फरखड मत मांडले आहे.

**अण्णा भाऊ साठे यांची ओळख केवळ कवी, लेखक, कादंबरीकार, कथाकार, पोवाडेकार, नाटककार, शाहीर अशी करता येणार नाही. तर महाराष्ट्राच्या जातीभेदाच्या उतरंडीला दूर करणारा आणि गावकुसाबाहेरच्या समाजाला जागे करणारा असा हा क्रांतिकारी ओळख निर्माण करणारा वास्तववादी साहित्यिक म्हणून करण्यात आली. याशिवाय प्रत्यक्ष कृतीत सहभाही होऊन कामगाराच्या लढ्यात हिरीरीने सहभागी होणारा लढवय्ये होते.**

अण्णाभाऊंनी कामगार चळवळीसह भारतीय स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि गोवा मुक्ती संग्रामाच्या चळवळीत सहभागी होऊन त्यांनी जनजागृतीचे महत्त्वपूर्ण काम केले. जो माणूस देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत उतरतो, जीवनदायी कम्युनिस्ट होतो, मुंबईत कामगारांचे लढे उभारतो, लढे उभे करताना जे प्रश्न पडतात त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो, त्या प्रयत्नातून साहित्यिक एक लढावू कागार बनतो. अण्णाभाऊ केवळ कामगार चळवळीत सहभागी होत नाहीत तर प्रत्यक्ष काम करत असताना आलेले अनुभव त्यांनी आपल्या पोवाड्यातून मांडत असायचे. त्यांच्या या धारधार शब्दांने चळवळीतील कामगारांना एक हुरूप भरायचा आणि अधिक संख्येने कामगार प्रत्येक चळवळीत सहभागी होत असायचे.